# अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद

## वार्षिक अहवाल २०१२-२०१३

### (१ एप्रिल २०१२ ते ३१ मार्च २०१३)

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचा इ. सन. २०१२-१३ सालचा वार्षिक अहवाल सादर करण्यास नियामक मंडळास अतिशय आनंद होत आहे.

### ◆ नियामक मंडळ सभा ◆

नियामक मंडळाच्या एकूण चार सभा झाल्या. या सभांना मुंबई व मुंबईबाहेरील बहुसंख्य सभासद उपस्थित होते. (उपस्थिती पान क्र. ८) सभेत महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले.

### ◆ कार्यकारी समिती सभा ◆

कार्यकारी समितीचे पदाधिकारी व सदस्य कार्यपरत्वे नाट्य परिषदेच्या कार्यालयात हजर राहून निरपेक्ष भावनेने परिषदेचा कार्यभार सांभाळीत आहेत. त्यामुळे नाट्य सृष्टीच्या सर्व घटकांचा परिषदेच्या कार्यालयाशी सातत्याने संपर्क साधला जात आहे. कार्यकरी समितीच्या एकूण तीन सभा झाल्या. (उपस्थिती पान क्र. ७) १४ जून २०१२ चा भव्य कलावंत मेळावा व पारितोषिक वितरण समारंभ, नाट्यसंमेलन हे परिषदेचे महत्वपूर्ण उपक्रम होत.

### ◆ वार्षिक सर्वसाधारण सभा ◆

नियामक मंडळ अस्तित्वात नसल्याने सन २०११-२०१२ ची परिषदेची वार्षिक सर्वसाधारण सभा होऊ शकली नाही.

### ◆ आजीव सभासद ◆

परिषदेची एकूण सभासद संख्या दि. ३१.०३.२०१३ अखेर १६५३८ झाली आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| संस्था सभासद | १३ | उपकर्ते | १५ |
| आश्रयदाते | १२ | हितचिंतक | ०७ |
| मध्यवर्ती आजीव सभासद | ४२४४ | सन्माननीय सभासद | ०९ |
| शाखा आजीव सभासद | १२२३८ | (शाखांची सदस्य संख्या पान क्रमांक पाच व सहावर दर्शविण्यात आली आहे) | |

### ◆ आर्थिक मदत ◆

आवश्यकतेनुसार गरजू व वृध्द कलावंतांना नाट्य परिषद आर्थिक सहाय्य करीत असते.